# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ३२५** **दिनांक २०/११/२०२१**

## ४२ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मॅफेड्रॉन) नावाचा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या नायजेरीयन ईसमास अटक- अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांची कारवाई

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे तुळींज पोलीस ठाण्याचे परिसरात दिनांक १८/११/२०२१ रोजी गस्त करित असतांना प्रगतीनगर, ९० फुट रोड येथील चार रस्ता या ठिकाणी रोडवर एक ईसम रिजवान सादीक पटेल वय २३ वर्षे, रा. फ्लॅट क्र. ०४, सी विंग, गुरुकृपा बिल्डींग, ठाकुर स्कुल जवळ, प्रगतीनगर, नालासोपारा (पुर्व), ता. वसई, जि. पालघर हा त्याचे कब्ज्यात २४,०००/-रु. किंमतीचा व ३ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ (एम.डी) यामहा मोटार सायकलसह मिळुन आला होता. त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्यास नमुद अंमली पदार्थ विक्री करीता पुरविणारा ईसम नायजेरीयन नागरिक फुईके ओक्येवय ४१ वर्षे, सध्या रा. ९० फुट रोड, नालासोपारा (पुर्व), पत्ता. चौथा मजला, कृष्णा बिल्डींग, मंगल नगर भाजी मार्केट जवळ, हाटकेश, मिरारोड (पुर्व) मुळ रा. व्हिलेज-ईनिग, स्टेट-ओयीडीए, देश- नायजेरीया यास ताब्यात घेवून झडती घेतली असता त्याचे कब्ज्यात ३९ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असताना मिळुन आला असुन सदर कारवाई दरम्यान एकुण ४२ ग्रॅम वजनाचा व ३,३४,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला असुन सदर कारवाई मध्ये एकुण ०३,९९,०००/-रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर आशय वरिष्ठांना कळवुन डॉ. महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे) तसेच श्रीमती पदमजा बढे अति. कार्यभार सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे सुचना व मार्गदर्शना प्रमाणे कारवाई करण्यात आली. नमुद आरोपीविरुध्द अंमली पदार्थ कायदा कलम ८ (क), २१ (ब), २९ प्रमाणे तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन नमुद दोनही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास तुळींज पोलीस ठाण्याकडुन चालु आहे.

सदरची कारवाई डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्रीमती पदमजा बढे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक देवीदास हंडोरे, पोलीस निरीक्षक संतोष चौधरी नेमणुक-अ.मा.वा. प्रतिबंध कक्ष, नालासोपारा विभाग, सहा. पोलीस निरीक्षक, श्री. विलास कुटे, पो.हवा.२१८८/धनाजी इंगळे, पोना.२५४/पवन पाटील, पोशि. ३४७२/अजय यादव, पो.ना.२५४७/अजय सपकाळ, पो.शि.१२०४/ विष्णुदेव घरबुडे यांनी केली आहे.